महापालिका अधिकारी एसीबी'च्या रडारवर!

बांधकाम विभागात चौकशी

पिंपरी : महापालिकेच्या बांधकाम विभागाने गतआर्थिक वर्षांत सुमारे १ हजार ४०० बांधकामांना परवानगी दिली. परंतु, शहरातील किती बांधकामांना पुर्णत्वाचा दाखला देण्याबाबत बांधकाम विभागाकडे फाईल' प्रलंबित आहेत. याविषयी बांधकाम विभागाच्या शहर सहअभियंत्यांकडे आकडेवारी उपलब्ध नाही. बांधकाम पुर्णत्वाचा दाखला देण्यासाठी अधिकारी लाखो रुपयांचा मलिदा लाटत असल्याचे निदर्शनास आले आहे. परिणामी, संबंधित अधिकारी लाचलूचपत प्रतिबंधक विभागाच्या रडारवर आहेत.

बांधकाम पुर्णत्वाचा दाखला देण्यासाठी लाचखोरी प्रकरणी महापालिका आयुक्ताचा स्टेनो राजेंद्र शिर्केला अटक केली. त्यानंतर बांधकाम विभागातील भ्रष्टाचाराचा मुद्दा ऐरणीवर आला आहे. श्रीमंत महापालिका असलेल्या पिंपरी-चिंचवड शहरात जमिनीचे भाव गगनाला भिडले आहेत. महापालिकेत बांधकाम, नगररचना व स्थापत्य विभागात अधिकाऱ्यांची बिल्डरांसह लागेबांधे सुरु आहेत. बांधकाम विभागात आतापर्यंत बांधकाम पुर्णत्वाचा दाखला मागणीसाठी एकूण किती फाईल आल्या. त्यापैकी किती फाईल मंजूर करुन दाखले दिले. अद्याप किती फाईल देणे बाकी आहे? याविषयी वरिष्ठांकडे एकत्रित आकडेवारी उपलब्ध नाही. तसेच, लाचखोरी प्रकरणानंतर एसीबी'ने बांधकाम विभागातील फाईलचा तांत्रिक अभ्यास सुरु केला आहे. लाचखोरी प्रकरणामुळे संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांचे जाबजबाब घेण्यासाठी पुण्यातील एसीबी'च्या कार्यालयात अनेकांना बोलावण्यात आले आहे. त्यामुळे वरिष्ठ अधिकाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.

■ फाईल वर्गवारी करण्याचे आदेश

बांधकाम विभागात अनेक उपअभियंता महापालिकेत रात्री उशिरापर्यंत थांबून कामकाज करीत आहेत. त्यामुळे निश्चित कागदपत्राची फेरफार करुन लाचखोरीला चालना हेच अधिकारी देवू लागले आहेत. बांधकाम विभागातील अनेक उपअभियंता बांधकाम परवानगी, बांधकाम पुर्णत्वाचा दाखला, टीडीआर प्रस्ताव, एसआरए याबाबत अनेक फाईल अडवून ठेवतात. दरम्यान, लाचखोरीचे प्रकरण उघडकीस आल्याने वरिष्ठ अधिकाऱ्यांनी उपअभियंत्यांची दप्तर तपासणी करुन फाईलची वर्गवारी करण्याचे आदेश बांधकाम विभागात दिल्याची चर्चा आहे.

वंचितांनी घेतला मामाच्या गावाचा आनंद

पुणे (प्रतिनिधी): हातावर अन चेहऱ्यावर नक्षीदार टॅटू काढताना बालचमूंच्या चेहऱ्यावर फुललेले निरागस हास्य छोटा भीम आणि २० फुटी टोपीवाल्या विदूषकाबरोबर हास्य विनोद करीत झिंगाट गाण्यावर मनसोक्त नाचणारी बच्चे कंपनी रंगीबेरंगी टोप्या घालून उंट आणि घोडागाडीच्या सफरीची मजा अशा वातावरणात चिमुकल्या भाचे मंडळींनी मामाच्या गावाच्या सफरीचा मनसोक्त आनंद लुटला. उन्हाळ्याच्या सुट्टीतील मामाच्या गावाला जाण्याची मजा समाजातील अनाथ आणि वंचित मुलांना अनुभवायला मिळावी, याकरीता या आगळ्यावेगळ्या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.

शुक्रवार पेठेतील सेवा मित्र मंडळ ट्रस्टतर्फे गणेश मंदिराच्या वर्धापन दिनानिमित्त दरवर्षी हा उपक्रम आयोजित केला जातो. यावेळी महापौर मुक्ता टिळक, शैलेश टिळक, विशेष पोलीस महानिरीक्षक चंद्रशेखर दैठणकर, सामाजिक कार्यकर्ते डॉ. मिलींद भोई, उदय जगताप, बालकलाकार मिहीर सोनी, वैष्णवी काळे, सेवा मित्र मंडळाचे शिरीष मोहिते, अध्यक्ष प्रदीप महाले, उपाध्यक्ष अमोल नाईक आदी यावेळी उपस्थित होते.

अनाथ मुलांसाठी काम करणारी माहेर, देहविक्री करणाऱ्या महिलांच्या मुलांसाठी काम करणारी वंचित विकास आणि एकलव्य न्यास, रस्त्यावर भीक मागणाऱ्या मुलांसाठी काम करणारे बचपन वर्ल्ड फोरम, दगडखाण कामगारांच्या मुलांसाठी काम करणारी संतुलन पाषाण, श्रीवत्स आदी संस्थांमधील मुले या उपक्रमात सहभागी झाले होते. यावेळी चिमुकल्यांच्या आग्रहानंतर महापौर मुक्ता टिळक यांनीही मुलांसोबत झिंगाट गाण्यावर ठेका धरला. चिमुकल्यांमध्ये मिसळून फेर धरण्यासोबतच त्यांच्याशी गप्पा मारताना टिळक देखील त्यांच्याशी एकरुप झाल्या.

३० लाख शेतकऱ्यांना कर्जासाठी आराखडा तयार करा!

■ बँकांची स्थिती नाजूक

जिल्हा बँका डबघाईला आल्याने पीक कर्ज वाटपाचे लक्ष्य पूर्ण होत नाही. राज्यातील ३१ बँकांपैकी ११ बँका तोट्यात असून त्यापैकी सोलापूर, बीड, उस्मानाबाद, नांदेड, जालना, परभणी, बुलडाणा, वर्धा आणि नागपूर येथील बँकांची स्थिती अत्यंत नाजूक आहे. त्यामुळे आर्थिक अडचणीत सापडलेल्या जिल्हा मध्यवर्ती बँकांचे शिखर बँकेत विलीनीकरण करा, असे मत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी खरीप आढावा बैठकीत व्यक्त केले.

मुंबई : शेतकऱ्यांना मदत करणे हे आपले कर्तव्य आहे, त्यासाठी अविश्रांत काम करा, असा सल्ला देतानाचा कर्जाच्या परिघाबाहेर गेलेल्या ३० लाख शेतकऱ्यांना कर्ज उपलब्ध होईल यासाठी तात्काळ योजना तयार करा, असे स्पष्ट निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अधिकाऱ्यांना दिले. अडचणीत असलेल्या १० ते १२ जिल्हा बँकांचे ग्रामीण भागात जाळे मोठे आहे.

त्याचा उपयोग करुन कमर्शियल बँकांनी आर्थिकदृष्ट्या सक्षम नसलेल्या बँकांना एजंट बनवून टार्गेट पूर्ण करावेत. शेतकऱ्यांना कर्ज उपलब्ध करून देण्याबाबत पालकमंत्र्यांनी लक्ष घालावे, अशा सूचना मुख्यमंत्र्यांनी यावेळी केल्या.

सन २०१७-१८ ची राज्यस्तरीय खरीप हंगाम पूर्व आढावा बैठक मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान येथे संपन्न झाली. त्यावेळी बोलताना मुख्यमंत्र्यांनी अधिकाऱ्यांना निर्देश दिले.

यावेळी मंत्री, राज्यमंत्री यांच्यासह मुख्य सचिव, सहकार विभागाचे प्रधान सचिव, कृषी विभागाचे प्रधान सचिव, सर्व विभागीय आयुक्त, सर्व जिल्हाधिकारी, स्टेट बँकेच्या अध्यक्ष अरुंधती भट्टाचार्य, संबधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

यावर्षी कर्जाचे नियोजन करताना स्टेट फोकस पेपर प्रकाशित केला आहे. ३० ते ३१ लाख शेतकरी हे कर्जाच्या परिघाबाहेर गेले आहेत त्यांनाही कर्जपुरवठा झाला पाहिजे, यासाठी अपर मुख्य सचिव वित्त यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे. या समितीने नियोजनबद्ध आराखडा करुन प्रत्येक शेतकऱ्याला कर्ज उपलब्ध करुन देता येईल असे नियोजन करावे, अशा सूचना मुख्यमंत्र्यांनी अधिकाऱ्यांना केल्या.

कृषी आणि पणन विभागाने स्टोरेज आणि फूड प्रोसेसिंगसाठी जास्तीत काम केले पाहिजे. शेतकऱ्यांना चांगला भाव देण्यासाठी या दोन गोष्टी महत्त्वाच्या आहेत. यंदा दुष्काळी परिस्थिती उद्भवली तर जिल्हाधिकाऱ्यांनी त्याला तोंड देण्यासाठीचा आराखडा आतापासून तयार करावा. पुढचे तीन महिने महत्वाचे आहेत. आराखडा तयार करताना त्या भागातील समस्यांचा आढावा जिल्हाधिकाऱ्यांनी घ्यावा. त्यामुळे सर्व करण्याची तयारी ठेवा, असे मुख्यमंत्र्यांनी अधिकाऱ्यांना निर्देश दिले. जालना जिल्ह्याने पीक कर्ज विमा योजनेत शंभर टक्के सहभाग घेऊन महाराष्ट्रात पहिला क्रमांक मिळविल्याने मुख्यमंत्र्यांच्या हस्ते संबंधितांचा सत्कार करण्यात आला.

काँग्रेस-राष्ट्रवादीमुळेच शेतकऱ्यांच्या आत्महत्या : नितीन गडकरी

पिंपरी (प्रतिनिधी) : महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या चिंताजनक आहेत. काँग्रेस-राष्ट्रवादीच्या सरकारने शेतकऱ्यांसाठी काहीच केले नाही. त्यांनी शेतकऱ्यांचे शोषण केले. शेतकऱ्यांच्या आत्महत्येसाठी आघाडीचे सरकारच जबाबदार आहे. महाराष्ट्रात जोपर्यंत ५० टक्के सिंचन होत नाही, तोपर्यंत शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबणार नाहीत, असे मत केंद्रीय दळणवळण मंत्री नितीन गडकरी यांनी चिंचवड येथे केले. तसेच महाराष्ट्राचा कृषी विकास दर वाढविला पाहिजे, अशी सूचना मुख्यमंत्र्यांना केली.

चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे सभागृहात भाजपच्या कार्यकारिणी समितीच्या दोन दिवसीय अधिवेशनाचे गडकरी यांच्या हस्ते उद्घाटन झाले. त्यावेळी ते बोलत होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष रावसाहेब दानवे, केंद्रीय मनुष्यबळ विकासमंत्री प्रकाश जावडेकर, संरक्षण राज्यमंत्री डॉ. सुभाष भामरे, गृहराज्यमंत्री हंसराज अहिर, महाराष्ट्राचे प्रभारी सरोज पांडे, सह प्रभारी राकेश सिंह, राष्ट्रीय संघटनमंत्री व्ही. सतिश, श्याम जाजू, महसूलमंत्री चंद्रकांत पाटील, शिक्षणमंत्री विनोद तावडे, युवा मोर्चाच्या अध्यक्षा पुनम महाजन, ग्रामविकास मंत्री पंकजा मुंडे, पुण्याचे पालकमंत्री गिरीश बापट, माजी मंत्री एकनाथ खडसे, राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर, राज्य मंत्रिमंडळातील मंत्री, सर्व खासदार, आमदार, भाजपचे महापौर, जिल्हा परिषदेचे अध्यक्ष आदी पदाधिकारी उपस्थित होते.

आगामी काळात पाण्याचा प्रश्न गंभीर बनणार आहे. ७० टक्के पाणी समुद्रात वाहून जाते. पाणी साठवून ठेवण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. १५ टक्के पाणी साचवून ठेवले तर ५० टक्के क्षेत्र पाण्याखाली येईल, असे सांगत गडकरी म्हणाले की, विरोधक आता संघर्ष यात्रा काढत आहेत.

सत्तेत असताना त्यांनी शेतकऱ्यांसाठी काहीच केले नाही. शेतकऱ्यांचे शोषण केले. शेतकऱ्यांच्या आत्महत्येला काँग्रेस -राष्ट्रवादीच जबाबदार आहे. आघाडी सरकारच्या काळात राज्याचा कृषी विकासाचा दर निचांक पातळी होता. भाजप-शिवसेना सरकारच्या गेल्या अडीच वर्षाच्या काळात कृषी विकासाचा दर १२.५० टक्के झाला आहे. पुढील दोन वर्षात कृषी विकासाचा दर आणखी वाढला पाहिजे. २० टक्के दर झाला पाहिजे, अशी सूचना गडकरी यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना केली. तसेच मध्यप्रदेशचा कृषी विकास दर २५ टक्के असल्याचेही, त्यांनी सांगितले.

बिल्डरांवर आजपासून 'रेरा'चा अंकुश!

मुंबई : बांधकाम क्षेत्राला शिस्त आणि बिल्डरांच्या मनमानीला चाप लावून ग्राहकांना संरक्षण देण्यासाठी करण्यात आलेला 'रिअल इस्टेट रेग्युलेशन ॲक्ट' (रेरा) एक मे महाराष्ट्र दिनापासून राज्यात लागू होणार आहे. आठपेक्षा जास्त फ्लॅट किंवा ५०० चौरस मीटरपेक्षा जास्त प्लॉटवर राबविण्यात येणारे कोणतेही गृहनिर्माण तसेच वाणिज्यिक बांधकाम प्रकल्प हे आता या कायद्याच्या कक्षेत आले आहेत. या कायद्याचा भंग केल्यास बिल्डरांना दंड तसेच तुरुंगवासाची शिक्षा होणार आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या महत्त्वाकांक्षी योजनांमधील सर्वांसाठी घरे या योजनेसाठी नवा गृहनिर्माण कायदा २०१५ मध्ये लागू करण्यात आला. त्यानुसार राज्य सरकारनेही राज्यात 'रेरा'ची अंमलबजावणी करण्याचा निर्णय घेतला. त्यासाठी महाराष्ट्र गृहनिर्माण कायदा अर्थात स्थावर संपदा अधिनियम २०१६ कायदा विधिमंडळात मंजूर केला. या कायद्यातील अनेक तरतुदींना बिल्डरांनी विरोध केला होता. विशेषत: एखाद्या बांधकाम प्रकल्पासाठी ग्राहकांकडून पैसे घेतल्यास ते अन्य प्रकल्पाकडे वळविता येणार नाहीत, या तरतुदींला बिल्डरांनी कडाडून विरोध केला. मात्र, केंद्राच्या मूळ कायद्यातच ही तरतूद असल्याने ती बदलण्यास राज्य सरकारने नकार दिला होता. शेवटी हरकती व सूचना ऐकून घेतल्यानंतर मंत्रिमंडळाने डिसेंबर २०१६ मध्ये एक मेपासून राज्यात 'रेरा'ची अंमलबजावणी करण्याचा निर्णय घेतला होता. त्यानुसार या कायद्याची अंमलबजावणी सुरू होणार आहे.

देशातील बांधकाम व्यवसायाला शिस्त लावणे आणि ग्राहकांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी केंद्र सरकारने तयार केलेल्या 'रेरा' कायद्याच्या मसुद्यावर २५ मार्च २०१६ रोजी राष्ट्रपतींनी स्वाक्षरी केल्यानंतर हा कायदा देशभर लागू झाला. या कायद्याच्या अंमलबजावणीसाठी राज्यांना स्वंतत्र कायदा करण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. महाराष्ट्र सरकारने 'रेरा' अस्तित्वात येण्यापूर्वीच २०१२ मध्ये महाराष्ट्र गृहनिर्माण कायदा संमत केला होता. मात्र, केंद्र सरकारने संपूर्ण देशासाठीच कायदा केल्याने हा कायदा मोडीत निघाला. 'रेरा'तील तरतुदीनुसार राज्यांना गृहनिर्माण नियामक प्राधिकरण स्थापन करावे लागणार आहे.

पंकजा मुंडेंची माघार म्हणजे राजकीय खेळी : नामदेव शास्त्री

अहमदनगर : भगवानगडाचे महंत नामदेव शास्त्री आणि राज्याच्या ग्रामविकास मंत्री पंकजा मुंडे यांच्यातील वाद काही थांबत नसल्याचे चित्र आहे. पंकजा मुंडेंनी भगवानगडाच्या वादानंतर माघार घेतली असली तरी यात मोठी राजकीय खेळी असल्याचे महंत नामदेव शास्त्रींनी म्हटले आहे.

आम्ही भगवानगडाच्या विकासासाठीच गादीवर बसलो आहोत. भगवानगडावर किर्तनकाराशिवाय कोणाचाच आवाज निघणार नाही, असे नामदेव शास्त्री यांनी ठणकावले. पंकजा मुंडे यांना सौजन्याने वागायचे असेल आणि त्यांनी आपण गडावर भाषण करणार नाही, असे जाहीर करावे. हा वाद तेव्हाच मिटेल, असेही नामदेव शास्त्रींनी म्हटले आहे.

महावितरणकडून ग्राहकांची लूट

दापोडी (प्रतिनिधी) : महा-वितरण ग्राहकांची विविध प्रकारे मोठ्या प्रमाणात आर्थिक लूट व फसवणूक करीत असून हा प्रकार तातडीने थांबवावा, अन्यथा तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशारा वंदे मातरम् संघटनेने राज्याचे ऊर्जा मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना विविध मागण्यांतर्गत लेखी निवेदनाने दिला आहे.

महा-वितरणच्या पुण्यातील रास्ता पेठ मुख्य कार्यालयात ऊर्जा मंत्री बावनकुळे यांच्या उपस्थितीत नुकतेच जनता दरबाराचे आयोजन केले होते. यावेळी वंदे मातरम् संघटनेच्या वतीने प्रांत अध्यक्ष विकास हांडे, प्रांत कार्याध्यक्ष राजेश शर्मा व खडकी विभाग अध्यक्ष शिरिष रोच यांनी महा-वितरणच्या भोंगळ



कारभाराकडे लक्ष्य वेधण्याकरिता निवेदन दिले.

महा-वितरण देत असलेले वीज बील महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात दिले जाते. बील भरण्याची मुदत (तारीख) ही महिन्यातील शेवटच्या आठवड्यातील असते. या मुदतीनंतर पुढील महिन्याच्या १ ते १० तारखेच्या आत बील भरल्यास विलंब शुल्क म्हणून २० रुपये प्रत्येक ग्राहकाकडून उकळले जातात. महा-वितरणकडून येथेच ग्राहकांची लूट थांबवली जावी. १० तारखेनंतर वीज बील भरणाऱ्या ग्राहकांकडून ४० रुपये विलंब शुल्क आकारले जाते. अशा प्रकारे महा-वितरण ग्राहकांकडून दोन प्रकारे विलंब शुल्क आकारुन आर्थिक लूट व फसवणूक करीत असल्याचा आरोप संघटनेचे प्रांताध्यक्ष हांडे यांनी केला.

बील भरण्याची मुदत शेवटची तारीख असते, ही तारीख म्हणजे सर्वसामान्य गोर गरीब व मध्यम वर्गीयांची महिना अखेर असते सर्वांचे वेतन हे दि. १ ते १० तारखे दरम्यान होते, तेव्हा महावितरणाचे हे महिना अखेरचे विज बिल सर्वसामान्य नागरिक कसे भरू शकतात? त्यामुळे सर्व नागरिकांना दर महिन्यास किमान २० रुपये, तर कमाल ४० रुपये वीज बिलाचे विलंब शुल्क भरावेच लागते. ग्राहकांकडून अशा प्रकारे कोट्यवधी रुपयांची आर्थिक लूट महावितणकडून दर महिन्यास केली जात आहे. या व्यतिरीक्त स्थिर आकाराच्या नावाखाली ही भरमसाठ शुल्क ग्राहकांच्या माथी लादले जात आहे.

ग्राहकांची अशा प्रकारे केली जात असलेली आर्थिक लूट व फसवणूक तातडीने थांबवली जावी. या करिता वीज बिल भरण्याची मुदत ही महिन्याच्या पहिल्या आठवड्यातील तारिख १ ते १० असावी व त्यातारखे नंतर १५ तारखेपर्यंत विलंब शुल्क आकारण्याची मुदत राबवली जावी. तसेच ग्राहकाकडून दर महिना विजेचा वापर होत असल्यास स्थिर आकाराच्या नावे होणारी ग्राहकांची लूट थांबवावी, अशी मागणी संघटनेने केली आहे.

मनोहारी कथक नृत्यरचनांचा नेत्रसुखद 'अनुवेध'

पुणे : पारंपरिक आणि आधुनिक संगीताच्या मिलापातून सादर केलेल्या आकर्षक नृत्यरचना जॅपनीज वाद्ये आणि कथक नृत्य यांची अनोखी जुगलबंदी नृत्यरचनेतून दिलेला महिला सक्षमीकरणाचा सामाजिक संदेश रसिकांना नृत्याशी एकरुप करणारा अप्रतिम पदन्यास अशा मनोहारी कथक नृत्यरचनांचा नेत्रसुखद अनुभव रसिकांनी घेतला. ज्येष्ठ नृत्यांगना पं. मनिषा साठे यांच्यासह रंगमंचावर नृत्यसादरीकरण करीत युवा कलाकारांनी आंतरराष्ट्रीय नृत्य दिन उत्साहात साजरा केला.

मनीषा नृत्यालयातर्फे अनुवेध-वेध अखंड ऐक्याचा या कार्यक्रमाचे आयोजन कोथरुड येथील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात करण्यात आले होते. यावेळी लेखिका प्रतिभा शाहू मोडक, नगरसेविका माधुरी सहस्त्रबुद्धे उपस्थित होत्या. कार्यक्रमात गुरु पं. मनिषा साठे यांच्यासोबत त्यांच्या शिष्या आणि प्रशिष्या यांच्या कथक नृत्यशैलीतील विविध नृत्यरचनांचा आविष्कार रसिकांनी अनुभविला. कार्यक्रमाची सुरुवात पं. मनीषा साठे आणि त्यांच्या शिष्यांच्या निरतत शिव गिरीजा संग या धृपदाने झाली. पं. मनीषा साठे यांचे मनोहारी हावभाव आणि आकर्षक नृत्यशैलीने रसिकांची मने जिंकली. यानंतर आडा चौताल राधे रानी कृष्ण रुप धरी, मंद मंद मुसकाये हे द्वैत अद्वैत नकारात्मक विचार सोडून सकारात्मक विचार कसा करावा असा संदेश देणारी बी-पॉझिटिव्ह नृत्यरचना उपस्थितांच्या विशेष पसंतीस पडली.

नृत्यातून सादर केलेली यु सजा चांद तो छलका तेरे अंदाज का रंग ही गझल सोहम हर डमरु बाजे या नाट्यसंगीताचे सादरीकरण खेलत रघुराज आज रंगभरी होरी ही प्रभु रामचंद्रांची होळी दूरच राहा कृष्णा या नृत्यातून महिला सक्षमीकरणाचा दिलेला सामाजिक संदेश अशा नृत्यरचनांनी रसिकांची दाद मिळविली. उत्तरार्धात जॅपनीज तायको वाद्य आणि कथक नृत्य यांच्या आगळ्यावेगळ्या जुगलबंदीचे सादरीकरण होताच टाळ्यांचा कडकडाट झाला. पं. मनीषा साठे म्हणाल्या, नृत्यदिनाचा दिवस केवळ गुरु आणि शिष्यांनी साजरा करण्यापेक्षा यामध्ये रसिकांना समाविष्ट करावे, असा या कार्यक्रमाचा उद्देश होता.

१५ मे रोजी महावितरणवर कृषिपंपधारकांचा मोर्चा

प्रा. डॉ. एन. डी. पाटील

कोल्हापूर : राज्य इरिगेशन फेडरेशनशी झालेल्या चर्चेनंतर राज्यातील कृषिपंपधारकांना २२ पैसे सवलतीने बिल आकारणी करण्याच्या मुख्यमंत्र्यांनी काढलेल्या आदेशाचे पत्र ऊर्जामंत्र्यांकडून गहाळ झाले आहे. हे आदेशच सापडत नसल्याचे सांगत महावितरणने ४४ पैसे या वाढीव दराने वीज बिल आकारणी सुरू केली आहे. शासनाच्या या गलथानपणाचा आणि वाढीव बिल आकारणीच्या निर्णयाचा निषेध म्हणून येत्या १५ मे रोजी महावितरण कार्यालयावर कृषिपंपधारकांचा मोर्चा काढला जाणार आहे.

या मोर्चात कोल्हापूरसह सांगली, साताऱ्यातील शेतकरी व लोकप्रतिनिधी सहभागी होणार आहेत, अशी माहिती ज्येष्ठ नेते व फेडरेशनचे अध्यक्ष प्रा. डॉ. एन. डी. पाटील यांनी पत्रकार बैठकीत दिली.

महावितरणने १ जून २०१५ पासून ७२ पैसे युनिट असलेल्या विजेच्या दरात ४४ पैशांची वाढ करून तो प्रतियुनिट १ रुपये १६ पैसे इतका केला. ही दरवाढ परवडणारी नसल्याचे सांगत डॉ. एन. डी. पाटील यांच्या नेतृत्वाखालील इरिगेशन फेडरेशनच्या शिष्टमंडळाने मुख्यमंत्र्यांशी चर्चा केली. ऊर्जामंत्र्यांच्या उपस्थितीत झालेल्या या बैठकीत ४४ पैकी २२ पैसे शासनाने आणि २२ पैसे शेतकऱ्यांनी असा समसमान भार उचलावा, असे ठरले. सवलतीची ही रक्कम १८ कोटींची होते. त्यानुसार मुख्यमंत्र्यांनी आदेश काढले; पण अशा प्रकारचे कोणतेही आदेश आपल्याला मिळाले नसल्याचे महावितरणने सांगितले आहे. याचा शोध घेतला असता ऊर्जामंत्र्यांकडून हे आदेशच गहाळ झाल्याचे सांगण्यात आले आहे. आदेशच गहाळ झाल्याने न मिळाल्याचे कारण सांगत महावितरणने वाढीव दराची अंमलबजावणी तत्काळ सुरू केली आहे.

एप्रिलच्या बिलातून त्याची वसुलीही करण्यात येत आहे. महावितरण व महापारेषणला वीज गळती व चोरी रोखता आलेली नाही, त्याचा भुर्दंड मात्र शेतकऱ्यांवर बसवून वाढीव दराने आकारणी करत आहे, हे सर्व चुकीचे आहे. महावितरणची ही लबाडी बाहेर काढण्यासाठीच आता पुन्हा एकदा आंदोलनाचा मार्ग स्वीकारला असल्याचे प्रा. पाटील यांनी सांगितले. त्यासाठीच येत्या १५ मे रोजी महावितरणवर मोर्चा काढला जाणार आहे. दुपारी १ वाजता दसरा चौकातून मोर्चाला सुरुवात होऊन जिल्हाधिकारी कार्यालयामार्गे तो ताराबाई पार्कातील महावितरणच्या कार्यालयावर दुपारी २ वाजता धडकणार आहे.

■ शेतकऱ्यांच्या बदनामीविरोधात न्यायालयात जाणार

विदर्भ मराठवाड्यात कुणी एक रुपयाचेही वीज बिल भरत नाही. पश्चिम महाराष्ट्रातील शेतकरी प्रामाणिकपणे थकबाकी भरूनही ऊर्जामंत्री मात्र राज्यात १७ हजार कोटींची थकबाकी असल्याचे सांगत आहे. यासंदर्भात विभागनिहाय माहिती मागवली ते देण्यासही टाळाटाळ केली जात आहे. कोल्हापूर, सांगलीतील एकही शेतकरी थकबाकीदार नसतानाही थकबाकीदार म्हणून राज्यभर कृषिपंपधारकांची बदनामी केली जात आहे. स्वत:चा गैरकारभार लपवण्यासाठीच थकबाकीचे हे भूत उठवून बसवले जात आहे. शेतकर्यांची होणारी ही बदनामी खपवून घेणार नाही, असे सांगत याविरोधात ग्राहक न्यायालय अथवा उच्च न्यायालयात याचिका दाखल करणार आहे, असे प्रा. डॉ. एन. डी. पाटील यांनी सांगितले.